# फसवणुकीचे नवीन तंत्र

**नवीन फसवणूकीचे प्रकार (कोर्टात तुमच्या नावाने केस रजिस्टर्ड झाली आहे)**
**सध्या बजाज फायनान्स व इतरही अनेक फायनान्स कंपन्यांतर्फे सामान्य नागरीकांना वस्तू विकत घेण्याकरीता लोन देण्यात येते. लोनची रक्कम टप्प्याटप्प्यांनी भरायची सुविधा सुध्दा असते. त्यामध्ये कधी रक्कम भरता आली नाही अथवा डिडक्शनच्या वेळी बॅलन्स कमी असल्यास त्यावर सरचार्ज घेण्यात येतो.**
**याच परीस्थीतीचा फायदा घेवून ऑनलाईन फसवणूक करणारे गुन्हेगार आपल्याला फोन करून वरील प्रमाणे परीस्थीती सांगतील व तुमच्यावर दिल्ली येथील न्यायालयामध्ये केस दाखल झाली असून ती केस लढण्याकरीता रकमेची मागणी करतील. अशी कोणती रक्कम कोणालाही देवू नका व आपल्या आप्त स्वकीयांना व मीत्र परीवाराला याबाबत जागरूक करा.**
**कोणताही असा फोन आल्यास त्याची माहिती सायबर पोलीस स्टेशन वर्धा ला 07152-240723 या क्रमांकावर द्या.**
**वर्धा पोलीसांतर्फे जनहितार्थ.**